**माहे सप्टेंबर २०२४ महाचा मासिक अहवाल**

**मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.**

| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | सातारा | रिओ डॉबरमॅन | पोलीस हवा./११ जी.डी.मोरे | तळबीड पो. स्टे. गु. र. नं. २१४/२०२४ भा.न्या.सं.कलम १३७ (२) प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि. १४/०९/२०२४ रोजी तळवीड पो.स्ठे. हद्दीत राधा फुलारी वय ११ वर्षे ही मुलगी घरातुन निघुन गेली होती सदर गुन्हयाच्या घटनास्थळी सदर मुलीचा वापरातील फुल टी शर्टचा वास श्वान रिओ यास दिला असता श्वान रिओ हा मोकळया माळावरील झाडी झुडपातुन डोंगरातुन १५ कि.मी. अंतरापर्यंत जावून आबईचीवाडी जाणाऱ्या पाउल वाटेपर्यंत जावून थांबला अधिक तपास केला त्यावेळी सदर मिसींग मुलगी तिथुन जवळच असणारे उसाचे शेताजवळ मिळून आली.<br><br>अशा प्रकारे तपास कामात श्वान रिओ व त्याचे हस्तकांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २ | मुंबई शहर | श्वान माया<br>श्वान व्हिस्की | १)पोहवा/१४०८००<br>आबाजी तुकाराम झिटे<br>२)पो.शि./०९०३३०८<br>किरण पोपटदास बैरागी | निर्मलनगर पोलीस ठाणे मोठी हरविलेली व्यक्ती नं. ५२/२०२४ अन्वये तक्रार दाखल करण्यात आली होती. दि.१०/०९/२०२४ रोजी घटनास्थळी राखाडी रंगाच्या पॅन्टचा वास पोलीस श्वान माया हिस दिला श्वान माया ही घटनास्थळावरून राहत्या घराच्या दाराने खाली येवून ए.के. मार्ग चौकी पासून बांद्रा स्टेशनच्या मधल्या ब्रिजने पश्चिमेला गेली. तेथून रत्नागिरी बारपासून तलावाच्या दिशेने जावून टाटा मेमोरिअल हाऊस पासून उजविकडे वळून सदर बांद्रा रेल्वे कॉलनी समोरिल रस्त्याने उजव्या बाजूस वळून जे.टी. गॅलक्सीच्या समोरिल रस्त्यापासून १९ नं. रेल्वेगेट पर्यंत मार्गदर्शन केले.<br><br>पुढील तपासाकरीता नमुद प्रकरणातील हरविलेल्या इसमाचा शोध CCTV च्या आधारे घेतला असता दि ११/०९/२०२४ रोजी श्वान व्हिस्की हीस राखाडी रंगाच्या पॅन्टचा वास दिला असत घटनास्थळावरुन सरळ दिशेने डाव्या बाजूला असलेल्या फुटपाथवरुन अंदाजे ८०० ते ९०० मिटर पर्यंत जावून सिग्नल जंक्शन वरुन उजव्या बाजूला रस्त्याच्या पलिकडे जावून पुन्हा मागे फिरली, व सरळ दिशेने एस.व्ही. रोडने सरळ आली व डाव्या बाजूला असलेल्या बसस्टॉपच्या बाजूला असलेल्या पानटपरी जवळ येवून थांबली. पोलीस श्वान व्हिस्की ने केलेल्या मार्गदर्शनाच्या आधारे सदर ठिकाणावरील पानटपरिचा CCTV तपासला असता हरविलेली व्यक्ती सदर ठिकाणी बसली असल्याचे दिसून आली. सदर वस्तुचा वास पोलीस श्वान व्हिस्की हिस पुन्हा दिला असता तिने पानटपरीच्या डाव्या बाजुने पुन्हा माग काढत १०० ते २०० मिटर अंतरावर असलेल्या (केवलीपाडा) दत्त मंदीर रोडच्या सरळ दिशेने सुमारे ४०० ते ५०० मिटर अंतरावर असलेल्या एका टॉवर जवळ जावून थांबली. नमुद मार्गदर्शनाच्या आधारे टॉवरचा CCTV तपासला असता नमुद हरविलेल्या व्यक्ती टॉवरच्या बाजूला रस्त्यावरुन चालताना आढळून आली याच मार्गदर्शनाखाली आजुबाजुचे CCTV तपासले असता काही अंतरावर सदर हरविलेल्या व्यक्ती सुस्थितीत मिळून आली.<br><br>अशा प्रकारे मिसींग व्यक्ती शोधणेकामी श्वान माया श्वान व्हिस्की व त्यांचे हस्तकांनी महत्वाची कामगिरी केलेली आहे. |

| | |
|---|---|
| पोहवा/१४०८०० आबाजी तुकाराम झिटे मुंबई शहर | पो.शि./०९०३३०८ किरण पोपटदास बैरागी मुंबई शहर |
|  |  |

| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३ | भंडारा | ब्रुनो लॅब्राडोर | १) पोहवा/९४४ सतीशकुमार गिरीपुंजे<br>२) पोना/१०४८ आशीष बडवाईक | भंडारा पोलीस स्टेशन गु.र.नं.८७३/२०२४ एन.डी. पी.एस. ॲक्ट १९८५ चे कलम ८ (क) २० (B ii) २९ प्रमाणे सदर गुन्हा दाखल असून राखाडी रंगाची चारचाकी वाहन महिंद्रा एक्स यु व्ही ७०० नं. एम.एच. १५ ई.पी. ४३७२ ही भंडारा पोलीस स्टेशन चे पोलीसांनी तस्करीच्या संशयावरून ताब्यात घेतली होती. सदर वाहनामध्ये ०७ पांढ-या रंगाच्या पिशव्या ठेवण्यात आल्याच्या दिसून आले त्यामध्ये अंमली पदार्थ आहे किंवा कसे याची खात्री करण्यासाठी अंमली पदार्थ शोधक श्वान ब्रुनो यास वास घेण्यासाठी सोडले असता श्वान ब्रुनो याने पिशव्यांचा वास घेवुन भुंकून पिशव्यांमध्ये अंमली पदार्थ असल्याचा इशारा दिला.<br>अशा प्रकारे श्वान ब्रुनो व त्याचे हस्तकांनी अंमली पदार्थ शोधून देण्याकामी विशेष कामगिरी केलेली आहे. |



अशा प्रकारे माहे **सप्टेंबर २०२४** मध्ये श्वान पथकामार्फत अपहरण -०१, म. मिसींग - ०१, एनडीपीएस ॲक्ट - ०१, असे एकूण - ०३ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.